महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद
तुळजापुर रोड, उस्मानाबाद 413501
दुरध्वनी क्र. 02472-251745 फॅक्स - 02475-251052
*Email - stores.gposmanabad@dtemaharashtra.gov.in*

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. शातंउ/भांडार/विल्हेवाट/2022/ 1852 दि. 15/09/2022

## निविदा सुचना

शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद, या कार्यालयातील निरुपयोगी, वापरात न-येणारे फर्निचर निविदा प्रक्रियेद्वारा "जेथे आहे तेथुन व जसे आहे तसे या प्रमाणे" विक्री करावयाची आहे. इच्छुक नोंदणीकृत खरेदीदार, संस्थाकडून सिलबंद पाकीटात निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे -

| लॉट क्र. | साहित्याचा तपशील | निविदा शुल्क रु. (ना-परतावा) | अनामत रक्कम रु. | निविदा विक्री कालावधी | निविदा स्विकृती दिनांक व वेळ | निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ आणि ठिकाण. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 | 07 |
| 01 | अणुविद्युत, यंत्र, स्थापत्य विभागातील फर्निचर. | रु. 500/- | 5500/- | दि.16/09/2022 ते दि.26/09/2022 वेळ - 2.00 वा. पर्यंत. | दि.16/09/2022 ते दि.26/09/2022 वेळ - 3 वा. पर्यंत. | दि.26/09/2022 रोजी ठिक - 4 वा. स्थळ : प्राचार्य कक्ष, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद. |

तरी, इच्छुक नोंदणीकृत खरेदीदार संस्थानी निविदा अर्ज, लिलाव करण्यात फर्निचर पाहण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी भांडार विभाग, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे संपर्क साधावा.

(सुनिलकुमार अंधारे,)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद.

महाराष्ट्र शासन
**शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद**
तुळजापुर रोड, उस्मानाबाद 413501
दुरध्वनी क्र. 02472-251745 फॅक्स - 02475-251052

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## निविदेच्या अटी व शर्ती

| अ. क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 01. | मोहोरबंद पाकिटावर निर्लेखीत फर्निचर खरेदी करण्याकरीता निविदा 2022 असे स्पष्टपणे नमुद करुन निविदा समक्ष अथवा टपालाने दि. 26/09/2022 वेळ 3.00 वा पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी. |
| 02. | निविदा शुल्क रु. 500 (ना-परतावा) कार्यालयातील रोख शाखेत भरुन भांडार विभागाकडुन कोरी निविदा अर्ज घेता येईल. |
| 03. | जेथे आहे तेथुन व जसे आहे तसे या प्रमाणे निर्लेखीत फर्निचर विक्री करावयाची असल्याने यशस्वी निविदाधारकांनी ती तात्काळ ताब्यात घेवुन फर्निचरच्या हस्तांतरणाची सर्व प्रक्रिया निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| 04. | अनामत रक्कम, रु. 5500 (रु. पाच हजार पाचशे मात्र) (केवळ डी डी च्या स्वरुपात) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट, उस्मानाबाद येथील शाखेत देय असलेला निविदासोबत जोडावा लागेल. अनामत रक्कम निविदेसोबत जोडली नसल्यास निविदेचा विचार केला जाणार नाही तसेच संबंधीत निविदाकारास निविदा प्रक्रियेतुन वगळण्यात येईल. |
| 05. | निविदा प्रक्रियेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| 06. | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासुन रोख रक्कम 02 दिवसाच्या आत रोखपाल, रोख विभाग, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद यांच्याकडे भरुन त्याबाबतची पावती हस्तगत करुन निर्लेखीत फर्निचरचा प्रत्यक्ष ताबा घ्यावा. परंतुक, असे निर्लेखीत फर्निचर हस्तांतरीत करतेवेळी शासकीय मालमत्तेचे, आणि इमारतीचे, नुकसान झाल्यास असे नुकसान भरपाई देण्याबाबतचे बंधपत्र यशस्वी निविदधारकास लिहुन द्यावे लागेल. |
| 07. | निर्लेखीत फर्निचर निविदाधारकास पाहण्यासाठी कार्यालयीन दिवशी (सुटटीचे दिवस वगळुन) 11 ते 5 या वेळेत पाहता येईल. निविदाधारकास निर्लेखीत फर्निचर पाहण्यासाठी भांडार विभाग, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे ठेवण्यात आले आहे. |
| 08. | निविदा उघडतेवेळी निविदाकारास किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल. निविदाकारास किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीस निविदा प्रक्रियेवर आक्षेप नोंदवायचे असल्यास असे आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावे लागतील. अशा आक्षेपांवर सक्षम प्राधिकारी निर्णय घेतील. |
| 09. | यशस्वी निविदाकार निविदेतील अटी व शर्ती, निर्लेखीत फर्निचरचा प्रत्यक्ष ताबा घेण्यास अयशस्वी अथवा असमर्थता दर्शविल्यास निविदाधारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| 10. | ज्या निविदाकारास महाराष्ट्र शासनाने फसवेगिरी, किंवा अन्य अवैध व्यवसायीक व्यवहार इ. कारणांसाठी अपात्र ठरविले आहे अशा निविदाकारास निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. |
| 11. | कोणतीही पुर्वसुचना न-देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचा हक्क प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद हे राखुन ठेवत आहेत. |

(सुनिलकुमार अंधारे,)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद.